# महाराष्ट्र शासन


## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210


क्रं.उशिनाग/ शिष्यवृत्ती/ ५१६१ /२०२१ दिनांक ०९/०९/२०२१

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर

२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक

३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर

५. संचालक, शासकीय/सर्व प्राचार्य अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांचे खाते क्रमांक अद्ययावत करणेबाबत**

**संदर्भ :- उशिस/शिष्य-२०२१/डीबीटी/१००४५, दि. ०८.०९.२०२१**

उपरोक्त विषयाबाबत राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे महाडीबीटी पोर्टलवरून अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू पोर्टलवर महाविद्यालयांनी त्याचे प्रोफाईल अद्ययावत करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाडीबीटी पोर्टलमध्ये महाविद्यालयांना त्यांचे खाते क्रमांक नमुद करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

तथापि ज्या महाविद्यालयांना त्यांचे शिष्यवृत्ती खाते क्रमांकामध्ये बदल/ दुरूस्ती करण्याची आहे, अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील प्राचार्य लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या Update Bank Account या पर्यायाचा वापर करून आपले खाते क्रमांकामध्ये सुधारणा करावी. तसेच त्यासोबत खाते क्रमांक बदलाबाबतच्या कारणांच्या तपशिलासह प्राचार्य यांच्या स्वाक्षरीचे पत्र व महाविद्यालयांचे नाव नमुद असलेले खाते क्रमांक चेक/ बँक स्टेटमेंट यांची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

महाडीबीटी पोर्टलद्वारे दिलेल्या पर्यायाच्या आधारे प्राचार्य लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीने विनंती केल्यानुसारच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्थ महाविद्यालयाचे खाते क्रमांक अद्ययावत करण्यात येणार असून, या संचालनालयास स्वतंत्र पत्र/ईमेल पाठविण्याची आवश्यकता नाही.

याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

Scanned with CamScanner